करारनामा

एकुण जनरल स्टॅम्प रू. 100/–

गणेश नगर

सर्व्हे नं. 109/1 मौजा - नांदगाव तह - हिंगणघाट जि. वर्धा

: प्लॉटचे ईसारपत्र :

प्लॉटचे सौदा किंमत रुपये : रु. .....

अक्षरी रु. .....

व प्लॉटचे ईसारपत्र रुपये : रु .....

अक्षरी रु. .....

लिहून देणार : श्री संजय तेजमल ओस्तवाल वय. 55 धंदा : व्यापारए
रा. गांधी वॉर्ड हिंगणघाट जि . वर्धा

लिहून घेणार :

वय. वर्ष धंदा :
रा.

इ. सन 2020 साल कारणे ईसारपत्र लिहून देतो की

मी **गणेश नगर** हिंगणघाट चे मालक असून मौजा नांदगाव ता. हिंगणघाट जि . वर्धा येथील सर्व्हे नं . 109/1 मध्ये ले-आउट पाडलेले आहे . त्याचे नाव गणेश नगर असे आहे . या ले-आउट मधील प्लॉट क्र. तुम्हाला विकण्याचा सौदा पक्का केलेला आहे .

<u>प्लॉटची तपशील :</u>

मौजा नांदगाव ता. हिंगणघाट जि . वर्धा येथील सर्व्हे नं . 109/1 मधील पाडलेल्या ले-आउट मधील प्लॉट नं. ज्याची आराजी स्के. फुट हयाप्रमाणे प्लॉट आहे .

<u>प्लॉटची चतु:सीमा :</u>

पूर्वेस - .....

पश्चिमेस - .....

उत्तरेस - .....

दक्षिणेस -.....

सदर प्लॉट दर रूपये ..... /– प्रती चौरस फुट प्रमाणे आम्ही तुम्हास आज या लेखाने एकुण रूपये ...../– चे मोबदल्यात विकत देण्याबाबतचा सौदा करीत आहो.

1) इसारापोटी आज रोजी रूपये ..... अक्षरी .... प्राप्त झाले.

2) इसारापोटी आज रोजी रूपये ..... अक्षरी .... प्राप्त झाले.

3) सौद्यापोटी उर्वरीत रक्कमेपैकी रूपये ..... दि. / /20 पर्यंत दुय्यम निबंधक, सेलू यांचे कार्यालयात विक्रीपत्र रजिस्टर करते वेळी घेवून कायदेशिर विक्रीपत्र रजिस्टर करून देण्याचे ठरलेले आहे.

4) मुदतीच्या आत विक्रीपत्र करून न घेतल्यास व ठरलेल्या तारखेप्रमाणे इस्टॉलमेंट न मिळाल्यास दिलेली रक्कम परत मिळणार नाही व हा सौदा रद्द समजण्यात येईल.

5) लेआऊट मंजूरी नंतर बांधकाम करतांना शासकिय नियम व अटी लागू होतील आणि बांधकाम करणा–यास त्या शासकिय नियम व अटीचे आधिन राहुनच बांधकाम करावे लागेल. त्या बाबतीत विक्री करणार म्हणजेच लिहुन देणार जबाबदार राहणार नाही.

6) अभिन्यास मंजूरी करून घेतांना काही फेरबदल झाल्यास जसे प्लॉट नंबर, क्षेत्रफळ व चतु:सिमा मध्ये फेरबदल झाल्यास तो घेणार व देणार यांस मान्य राहील.

7) कराराप्रमाणे तुम्ही विक्रीपत्र करून न घेतल्यास करार संपुष्टात आल्यानंतर तुम्हांला त्या संबंधी कोणतेही कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार व हक्क राहणार नाही. जर काही कारवाही केली तर ती बेकायदेशिर समजण्यात येईल.

8) 15 महिने पुर्ण झाल्यानंतर तसेच सदर शेत रहिवासी प्रयोजनाचे अकृषक झाल्यावर प्लॉटची विक्री तुमच्या नावाने करून देण्यात येईल. विक्रीचे दिवशी प्लॉटचा नकाशा, 7/12 व आदेश्याची प्रत देण्यात येईल.

9) ही मिळकत कोणतेही बॅकेच्या, संस्थेच्या, व्यक्तीच्या कर्जाच्या बोझ्यात नाही तसेच कोणतेही व्यक्तिस अथवा संस्थेस गहाण अथवा हस्तांतरणाचा कोणतेही प्रकारचा लेख करून दिलेला नाही. निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांचेवर राहील ते त्याचे संपुर्ण निराकरण करून कायदेशिर बिनबोझ्याने विक्रीपत्र रजिस्टर करून देतील.

10) प्लॉटचा ताबा विक्रीचे दिवशी विक्री झाल्यावर देण्यात येईल.

11) ॲग्रीमेट, इस्टॉलेंट, विक्रीचा रक्कम देत असतांना, किंवा चेक देत असतांना ग्राहकाने कंपनीची ओरिजनल अधिकृत पावती घेणे अनिवार्य आहे. कच्ची पावती घेवून दिलेली रक्कम अन्यथा इतर कुणाच्या नावाचा दिलेला चेक हिशोबात ग्राह्य समजण्यात येणार नाही.

12) विक्रीपत्राचा संपूर्ण खर्च लिहुन घेणार यांचेकडे राहील.

13) सदर प्लॉटचा व्यवहार करतांना दिलेला चेक न वठल्यास सदर करारनामा रद्द समजण्यात येईल.

14) विक्रीचे वेळी विक्रीसाठी आवश्यक ते सर्व कागदपत्र लिहुन देणार हे देतील.

वरीलप्रमाणे नियम व अटी 1 ते 14 मी लिहुन घेणार वाचून व समजून घेतलेल्या आहे. त्या मला पुर्णपणे मान्य आहे. करीता हे ईसारचिठ्ठी कोणतीही नशापाणी न करता राजीखुशीने कोणाच्याही दबावाखाली न येता वाचून व समजावून घेवून त्यावर दोन साक्षदारांसमक्ष सह्या केलेल्या आहेत ते लिहुन घेणार व लिहुन देणार यांना व त्यांचे वारसदार / हितसंबधी यांना पुर्णपणे बंधनकारक व लागू आहे.

दि. / / —: लिहुन घेणार :—

.....

साक्षीदार :— —: लिहुन देणार :—

1. .....

2. ....